## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

# पैसे देत नागपूर मेट्रोत नोकरी देण्याच्या अफवांना बळी पडू नका

## मेट्रोच्या नावाने बनावट नियुक्ती पत्राच्या आधारे फसवणुकीचे प्रकार उघडकीस

## समाज माध्यमांतुन प्रसारित होणाऱ्या खोट्या माहितीपासून सावधान, नागपूर मेट्रोचे आवाहन




नागपूर: महा मेट्रोत नोकरी लावून देतो असे सांगत पैसे घेण्याचे अनेक प्रकार यापूर्वी घडले आहेत आहेत. महा मेट्रोत अधिकाऱ्याशी ओळख आहे, माझ्या ओळखीने तुम्हाला निश्चित पणे नौकरी मिळणार असे सांगून युवकांची दिशाभूल करत पैसे लाटण्याचे अनेक प्रकार समाजकंटक सतत करीत आहेत. या संबंधीची तक्रार मेट्रो प्रशासनाकडे येत असून बेरोजगार युवक या आमिषाला बळी पडत असल्याची परिस्थिती आहे.

परंतु अश्या कुठल्याही पद्धतीने नागपूर मेट्रोत नोकरी मिळत नसून या बद्दल नोकरी करता प्रयत्न करणाऱ्यांनी सतर्क राहावे असे आवाहन नागपूर मेट्रो करीत आहे. मेट्रोचे बनावट अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीचे बोगस नियुक्ती पत्र देखील काही युवकांना पैसे घेऊन देण्यात आले आहे. या पासून नागरिकांनी सावध रहावे. याशिवाय मेट्रो तर्फे तुमची नियुक्ती झाली असून मेल पाठवून देखील दिशाभूल केली जाते. अश्या मिथ्या मेल-आयडी पासून सतर्क रहावे. महा मेट्रोने या संबंधित सातत्याने नागरिकांना आवाहन केले आहे.

आजवर या संबंधाने शहराच्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्ह्याची नोंद देखील झाली आहे. असे प्रकार होत असतानाच फसवणुकीच्या या नवीन प्रकारापासून सर्वांनी सावध असावे असे आवाहन महा मेट्रो नागपूर तर्फे करण्यात येत आहे. महा मेट्रो तर्फे या संबंधाने सातत्याने पाठ पुरावा करत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न होत असतात. या संबंधाने मेट्रो तर्फे बातम्या देखील दिल्या आहेत. मेट्रो तर्फे पदभरती होत असतांना त्या संबंधीची सर्व माहिती महा मेट्रोची वेबसाईट www.mahametro.org व प्रतिष्ठित वर्तमान पत्रांमध्ये प्रकाशित केल्या जाते.

त्यामुळे पदभरती संबंधी कुठलीही माहिती मिळाल्यास याची संपूर्ण शहानिशा महा मेट्रोचे संकेत स्थळ किंवा मेट्रो भवन कार्यालयातून करावी, असे आव्हान महा मेट्रो, नागपूर तर्फे नागरिकांना केले जात आहे. असे फसवणुकीचे प्रकार या आधी देखील नागपुरात उघडकीस आले असून त्या प्रकरणात अनेक पोलीस तक्रार देखील झाली आहे. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करत सर्व सामान्य नागरिकांनी, विशेषतः तरुणांनी अश्या भूलथापांना किंवा अफवांना बळी पडू नये हे आवाहन महा मेट्रो तर्फे केले जात आहे.